
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2024
तरुण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. सुधाकर गायकवाड लिखित 'दलित सौंदर्यशास्त्र' ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत प्रा. श्यामसुंदर मिरजकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. सचिन गरूड.

# फुले, शाहू, आंबेडकरांनी सामाजिक विषमता नाकारली

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुधाकर गायकवाड यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमतावादी मूल्यांना नाकारले. तत्कालीन प्रचलित समाजव्यवस्था विषमतेला धर्मसत्तेचा आधार देऊन समर्थन करीत होती. या विषमताधारित समाजव्यवस्थेला आव्हान देऊन नाकारण्याचे काम बुद्धानंतर फुले, शाहू, आंबेडकर यांनी केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत सुधाकर गायकवाड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित फुले, शाहू, आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. गायकवाड लिखित 'दलित सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, युवकांनी समाजाच्या गरजा ओळखल्या पाहिजेत. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारकार्याचा आदर्श समोर ठेवून त्यांनी वाटचाल केल्यास प्रगती होईल.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज आणि फुले, शाहू, आंबेडकर यांच्या कार्यामध्ये स्त्री सन्मान, शेतकऱ्यांप्रती आस्था आणि शिक्षण हे समान धागे आहेत.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, फुले, शाहू, आंबेडकरांनी महाराष्ट्रात खूप मोठी वैचारिक क्रांती घडवून आणली.

'दलित सौंदर्यशास्त्र' ग्रंथावर झालेल्या चर्चेत डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. सचिन गरूड आणि प्रा. श्यामसुंदर मिरजकर यांनी सहभाग घेतला.

प्रास्ताविक केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. कैलास सोनवणे, उपकुलसचिव विलास सोयम आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2024
पुढारी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहानिमित्त शनिवार, दि. १३ रोजी सकाळी १०.३० वाजता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. 'अनंत पैलूचा सामाजिक योद्धा : दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रा. डॉ. प्रल्हाद लुल्हेकर व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संशोधन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2024
तरुण भारत

# ‘सतत नवीन गोष्टी शोधल्या पाहिजेत’

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी सतत शिकण्याची आणि नवीन तंत्रज्ञानाचा शोध घेत संशोधन केले पाहिजे, असे प्रतिपादन वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागाने आयोजित एम.एस्सी. भाग दोनच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहाने पार पडला. कार्यक्रमात ‘बदलत्या जगात विज्ञान आणि शिक्षणाची भूमिका“ यावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे होते. गंगावती सुतार, अनिरुद्ध पुरोहित, सिद्धी पाटील, तुषार सुतार या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. श्रुती खराडे आणि साधना परीट यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. एस. पी. दास, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. यु. एम. चौगुले, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एस. एस. पाटील आदी उपस्थित होते.

13 APR 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा फुले प्रखर बुद्धिवादी साहित्यिक : डॉ. रवींद्र ठाकूर

## विद्यापीठातर्फे ऑनलाईन विशेष व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा



डॉ. रवींद्र ठाकूर

कोल्हापूर, ता. १२ : महात्मा जोतिराव फुले हे प्रखर बुद्धिवादी लेखक, साहित्यिक होते. मात्र, त्यांचा कोणीही साहित्यिक म्हणून उल्लेख केला नाही, हे वेदनादायी आहे, असे स्पष्ट मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रवींद्र ठाकूर यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले, शाहू, आंबेडकर सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत महात्मा फुले जयंतीच्या निमित्ताने विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यू ट्युब वाहिनीवरून डॉ. ठाकूर यांचे 'महात्मा फुले : व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर विशेष व्याख्यान झाले.

डॉ. ठाकूर म्हणाले, 'महात्मा फुले यांनी आपल्या आयुष्यात विपुल लेखन केले. 'सत्सार'सारखे नियतकालिक काढून पत्रकारिताही केली. मात्र, त्यांना या समाजाने साहित्यिक म्हणून मान्यता दिली नाही. ते प्रखर बुद्धिवादी होते. त्यांच्या विचारधारेत अंधश्रद्धेला थारा नाही. त्यांनी वर्णवर्चस्ववाद, जातिश्रेष्ठत्वाची मानसिकता यांविरुद्ध या बुद्धिवादाच्या बळावर रान उठविले. विद्येपासून वंचित समाजाला विद्यार्जनाचा मार्ग दाखविला. त्यांनी जसा सामाजिक विषमतेला विरोध केला, तसाच आत्माही नाकारला. त्यांनी धार्मिक कर्मकांडापेक्षा विचारांना महत्त्व दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2024
पुढारी


# म. फुले प्रखर बुद्धिवादी साहित्यिक : डॉ. ठाकूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महात्मा जोतिराव फुले हे प्रखर बुद्धिवादी लेखक, साहित्यिक होते. मात्र, त्यांचा कोणीही साहित्यिक म्हणून उल्लेख केला नाही, हे वेदनादायी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. रवींद्र ठाकूर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले, शाहू, आंबेडकर सप्ताहांतर्गत महात्मा फुले जयंती निमित्ताने विद्यापीठाच्या शिव-वार्ता यूट्यूब वाहिनीवरून डॉ. ठाकूर यांचे 'महात्मा फुले : व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. यावेळी ते बोलत होते. डॉ. ठाकूर म्हणाले, महात्मा फुले यांनी आयुष्यात विपुल लेखन केले. महात्मा फुले यांच्या विचार व कार्याकडे अभ्यासकांचे, साहित्यिकांचे लक्ष जाऊ लागले आहे. त्यांच्या साहित्याविषयी संशोधन, लेखन होऊ लागले आहे, ही महत्त्वाची बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2024
पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात इशरे कोल्हापूर चॅप्टरच्या उद्घाटनप्रसंगी अनुप बलानी. सोबत डॉ. एस. एन. सपली, डॉ. प्रवीणकुमार पाटील आदी.

# विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात 'इशरे कोल्हापूर स्टुडंटस् चॅप्टर'चा प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात इशरे (इंडियन सोसाईटी ऑफ हीटिंग रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स) कोल्हापूर स्टुडंटस् चॅप्टरचा प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन इशरे मुख्यालय दिल्लीचे अध्यक्ष अनुप बलानी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बलानी यांनी विद्यार्थांशी संवाद साधला. चॅप्टरमार्फत विद्यार्थ्यांना उपलब्ध होणाऱ्या संधींबाबत मार्गदर्शन केले. इशरे स्टुडंटस् चॅप्टरचे तंत्रज्ञान अधिविभागातील शिक्षक सल्लागार म्हणून तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, शिक्षक समन्वयक म्हणून सहायक प्रा. सागर पोर्लेकर काम पाहणार आहेत. मनीष गुलालकरी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा शपथविधी पार पडला. सर्वप्रथम विद्यार्थी अध्यक्ष म्हणून निशांत सूर्यवंशी, उपाध्यक्षा म्हणून गायत्री गोखले, खजिनदार म्हणून ऋषीकेश पद्मन, सचिव म्हणून साई तोडकरी व इतर कमिटीमध्ये काम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. यावेळी 'इशरे'च्या वतीने मनीष गुलालकरी, प्रमोद पुणगावकर, सुरेश पाटील उपस्थित होते. तंत्रज्ञान अधिविभागाच्या वतीने डॉ. अजित कोळेकर, डॉ. प्रवीणकुमार पाटील आदी उपस्थित होते.

13 APR 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात 'इशरे' चॅप्टरचे उद्घाटन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात इशरे (इंडियन सोसायटी ऑफ हिटिंग रेफ्रिजरेटिंग अँड एयर कंडिशनिंग इंजिनिअर्स) कोल्हापूर स्टुडंटस् चॅप्टरचे उद्घाटन करण्यात आले. इशरे दिल्ली मुख्यालयाचे अध्यक्ष अनुप बलानीजी यांच्या हस्ते हे उद्घाटन झाले.

इशरे स्टुडंटस् चॅप्टरचे तंत्रज्ञान अधिविभागातील शिक्षक सल्लागार म्हणून अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, शिक्षक समन्वयक म्हणून सहायक प्रा. सागर पोर्लेकर काम पाहणार आहेत. मनीष गुलालकरी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा शपथ विधी झाला. सर्वप्रथम विद्यार्थी अध्यक्ष म्हणून निशांत सूर्यवंशी, उपाध्यक्षा म्हणून गायत्री [illegible], खजिनदार म्हणून ऋषीकेश [illegible], सचिव म्हणून साई तोडकरी व कमिटीमध्ये काम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. याप्रसंगी 'इशरे' तर्फे कोल्हापूर अध्यक्ष प्रमोद पुंगावकर, माजी अध्यक्ष सुरेश पाटील, तंत्रज्ञान अधिविभागातर्फे डॉ. अजित कोळेकर, डॉ. प्रदीपकुमार पाटील आदी उपस्थित होते.